28-04-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 04/27/2025 10:32 PM Page 1



# कलेतून होतो विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास

## समीक्षक डॉ. किरण बुडकुले यांचे प्रतिपादन; आंबिये महाविद्यालयात 'पेट्ल' उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड



विर्नोडा : समीक्षक डॉ किरण बुडकुले, अध्यक्ष रत्नमाला दिवकर, अध्यक्ष श्रद्धा माशेलकर, अद्वैत साळगावकर, उपप्राचार्य डॉ. लुसी जेम्स, संयोजिका प्रा. मानसी धाऊसकर व मान्यवर.

विर्नोडा, दि. २७ : नृत्य असो अथवा कोणतीही कला असो ती विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला प्राधान्य देते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास अशा कलांमधून होतो, असे प्रतिपादन समीक्षक डॉ किरण बुडकुले यांनी केले. कोंकणी भाषा मंडळ, आमी पेडणेकर आणि संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य सरकारी महाविद्यालय विर्नोडा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या पेटूल या कार्यक्रमात डॉ. किरण बुडकुले बोलत होत्या. यावेळी कोंकणी भाषा मंडळाची अध्यक्षा रत्नमाला दिवकर,

नगर परिषदेच्या माजी अध्यक्षा श्रद्धा माशेलकर, युवा साहित्य अकादमी पुरस्कार विजेते अद्वैत साळगावकर,उपप्राचार्या डॉ. लुसी जेम्स, कार्यक्रमाच्या संयोजिका प्रा. मानसी धाऊसकर आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक आणि स्वागत रत्नमाला दिवकर यांनी केले. युग घोडगे, रत्नेश शिरोडकर, विघ्नेश नवसो कशाळकर, हार्दिक सचिन तारी, अद्रिका प्रदीप असोलकर, कृती नारायण असोलकर यांनी विविध सत्रांचे सूत्रसंचालन केले. यावेळी बालसाहित्यावर आधारित ग्रंथ प्रदर्शन देखील आयोजित करण्यात आले होते, ज्यामध्ये विद्यार्थी आणि शिक्षकांनीही लक्षणीय सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे संयोजन 'आमी पेडणेकर'च्या वेलंकी पेडणेकर आणि प्रतीक्षा च्यारी तसेच आंबिये महाविद्यालयातील कोंकणी विभागातील प्राध्यापिका मानसी धाऊसकर यांनी केले.

**पेडणे तालुक्यातील विविध शाळांचा समावेश**

संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य सरकारी महाविद्यालय विर्नोडा येथे आयोजित केलेल्या 'पेटूल' या कार्यक्रमात पेडणे तालुक्यातील विविध शाळांमधील मुलांनी एकत्र येऊन उत्साही नृत्य आणि संगीत सादरीकरणाद्वारे आपली प्रतिभा दाखवली. यामध्ये आत्मविश्वास विशेष मुलांची शाळा– तुये पेडणे, हुतात्मा मनोहर पेडणेकर सरकारी माध्यमिक विद्यालय –पेडणे, सरकारी माध्यमिक विद्यालय मुर्मूशे, किडझी – पेडणे, हरमल पंचक्रोशी शिक्षण मंडळ हरमल पंचक्रोशी हायस्कूल –हरमल, सरकारी प्राथमिक विद्यालय–केरी, सरकारी प्राथमिक विद्यालय, वॉव किड्स– पेडणे, सरकारी प्राथमिक विद्यालय– विर्नोडा, विद्या संकुल– तुये पेडणे, सरकारी प्राथमिक विद्यालय– आरोबा यांचा समावेश होता.

**'शाणी मस्ती ८' या, निमेशन व्हिडिओ आणि व्याकरण पुस्तकाचे अनावरण**

या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असलेल्या 'शाणी मस्ती ८' या सीडीचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याशिवाय मज्जा मस्ती या सीडीतील गाण्यांवर आधारित निमेशन व्हिडिओ, व्याकरणावर आधारित पुस्तक यांचेही यावेळी अनावरण करण्यात आले. ही शैक्षणिक संसाधने विशेषतः तरुण विद्यार्थ्यांसाठी भाषेविषयीचे शिक्षण अधिक आकर्षक आणि प्रभावी करण्यासाठी बनविण्यात आलेली आहे

# समर्थ पोर्टलवर आतापर्यंत नऊ हजार अर्ज दाखल

टीम दैनिक हेराल्ड

नोडल अधिकारी डॉ. महादेव गावस यांची माहिती : प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया

पर्वरी, दि. २७ : उच्च शिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत येणा्या शासकीय आणि अनुदानित महाविद्यालयांची प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया ११ एप्रिलपासून सुरू झाली असून आतापर्यंत समर्थ पोर्टलवर नऊ हजार अर्ज प्राप्त झालेले आहेत, अशी माहिती उच्च शिक्षण संचालनालयाचे नोडल अधिकारी डॉ. महादेव गावस यांनी दिली.

३० हून अधिक पदवीपूर्व कार्यक्रम समाविष्ट असणाऱ्या या प्रवेश प्रक्रियेत राज्यातील सुमारे ४० महाविद्यालयांनी सहभाग घेतलेला आहे. अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० एप्रिल आहे. विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी आणि त्यांचे अर्ज वेळेवर सादर करण्यासाठी उच्च शिक्षण संचालनालय गोवाच्या संकेतस्थळाला आणि समर्थ पोर्टलला भेट द्यावी, असे आवाहनही डॉ. गावस यांनी केले.

**बीए.एलएलबीसाठी जीयू क्लॅट परीक्षा ११ मे रोजी**

बीए. एलएलबीसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी जीयू क्लॅट परीक्षेला बसणे अनिवार्य असून ही परीक्षा ११ मे रोजी होणार आहे. यासाठीचे प्रवेश शुल्क गोवा विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाईट अथवा उच्च शिक्षण संचालनालय वेबसाईटच्या माध्यमातून भरणे आवश्यक आहे, अशी माहितीही डॉ. गावस यांनी दिली. ज्या अर्जदारांचे अंतिम निकाल अद्याप जाहीर झालेले नाहीत, ते देखील अर्ज करण्यास पात्र आहेत, असे डॉ. गावस म्हणाले.

**बीए.बीएड प्रवेश प्रक्रिया सुरू; ६ मे अर्ज करण्याची शेवटची तारीख**

बीए बीएड प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून ही प्रवेश प्रक्रिया ६ मे पर्यंत समर्थ पोर्टलवर चालणार आहे. यासाठी उमेदवाराने गोवा विद्यापीठाने घेतलेल्या जीयु–आर्ट २०२५ या परीक्षेत मिळालेले गुण ऑनलाईन अर्जात नमूद करणे आवश्यक आहे. हे गुण नमूद केले नाहीत तर अर्ज प्रवेशासाठी विचारात घेतला जाणार नाही, अशी माहिती डॉ. गावस यांनी दिली.



# अमोल काणेकर यांची केपेच्या उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि.२७ : केपेच्या उपनगराध्यक्षपदी भाजपचा पाठिंबा लाभलेले अमोल काणेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल माजी उपमुख्यमंत्री व भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष चंद्रकांत (बाबू) कवळेकर यांनी त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी केपेचे नगराध्यक्ष दीपाली नाईक, नगरसेवक दयेश नाईक, चेतन हळदणकर, गणपत मोडक, प्रसाद फळदेसाई, नगरसेविका सुचिता शिरवईकर, दक्षिण गोवा भाजपचे अध्यक्ष प्रभाकर गावकर, केपे मंडळ अध्यक्ष कृपेश वेळीप व माजी मंडळ अध्यक्ष संजय वेळीप उपस्थित होते.

कवळेकर यांनी काणेकर यांचे अभिनंदन करून त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. नगराध्यक्ष दिपाली नाईक यांच्या नेतृत्वाखालील केपे पालिका मंडळ एकसंध असून, पूर्ण मंडळ एकजुटीने केपे शहराच्या विकासासाठी झटत आहेत. उपनगराध्यक्षपदी निवड झालेले ज्येष्ठ नगरसेवक अमोल काणेकर नेहमीच भाजपच्या पॅनलसोबत राहिले आहेत. नगराध्यक्ष दिपाली नाईक व उपनगराध्यक्ष अमोल काणेकर सामंजस्याने व समन्वय साधून आपल्या सहकारी नगरसेवकांसोबत शहराचा विकास साधतील, असा विश्वास कवळेकर यांनी व्यक्त केला. केपे पालिका मंडळाला माजी उपमुख्यमंत्री बाबू कवळेकर, भाजप पक्ष संघटना तसेच सरकारचे पूर्ण सहकार्य मिळत असून कवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सहकाऱ्यांना सोबत घेऊन केपे शहराचा विकास साधण्यात येत आहे, असे नगराध्यक्ष दिपाली नाईक यांनी सांगितले.

# साखळीत 'वाचन साधना' रंगली !

टीम दैनिक हेराल्ड



साखळी, दि. २७ : जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून साखळी येथील नगर वाचनालयात 'वाचन साधना' कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत निवृत्त शिक्षक सुभाष शेटगावकर यांनी मार्गदर्शन केले. श्री. शेटगावकर यांची ही ७० वी कार्यशाळा होती. या कार्यशाळेत वाचन वेग व आकलन क्षमता वाढविण्यासाठी वाचन विषयक प्रात्यक्षिके घेण्यात आली. काना, मात्रा नसलेली व काना मात्रा असलेली अक्षरे पटकन ओळखण्याचा सराव, शास्त्रशुद्ध नजर फिरविण्याच्या सरावाने वाचन वेग वाढविणे,दृष्टीचा आवाका व रुंद पानावरील मजकूर भराभरा वाचण्याचा सराव, शब्दशोध–वेगळे परंतु एकसारखेच वाटणारे शब्द पटकन ओळखण्याचा सराव, वाक्यबोध–वेगळी परंतु एकसारखीच वाटणारी वाक्ये पटकन ओळखण्याचा सराव, आकलन–एखाद्या वास्तूमधील समानता किंवा भिन्नता पटकन ओळखण्याचा सराव आदी विषयांवर मार्गदर्शन केले.

वाचन कमी होण्याची कारणे व वाचनाची आवड निर्माण कशी करावी हे उदाहरणे देऊन स्पष्ट केले. या कार्यशाळेचे गुरुदास गावस मेमोरियल हायस्कूल गोकुळवाडी साखळीच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

उद्घाटन सोहळ्यास व्यासपीठावर निवृत्त शिक्षिका तथा माजी नगरसेविका शुभदा सावईकर, निवृत्त शिक्षक गजानन शेट्ये, गुरुदास गावस हायस्कूल साखळीचे शिक्षक दीपक गावस, ग्रंथालयाचे ग्रंथपाल ब्रिजेश चणेकर आदी उपस्थित होते. दीपप्रज्वलन करून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. वचन केरकर व आनंद नाईक यांनी मान्यवरांचे फुलांची रोपटी देऊन स्वागत केले. सौ.सावईकर यांनी यावेळी वाचनाचे महत्त्व कथन केले. यासारख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य वाढीस लागण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. यावेळी मार्गदर्शक श्री. शेटगावकर यांना स्मृतिचिन्ह व पुस्तक प्रदान करण्यात आले. सूत्रसंचालन दिव्या कोपार्डेकर यांनी केले.

# सुरेंद्र काकोडकर यांचे निधन

टीम दैनिक हेराल्ड



पणजी, दि. २७ : पणजी – भाटले येथील वृत्तपत्रातील जाहिरात क्षेत्रात अनेक वर्षे काम केलेले तथा सामाजिक कार्यकर्ते सुरेंद्र काकोडकर यांचे काल रविवारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी (दि१ मे) सकाळी सांतईनेज स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. गेली कित्येक वर्षे ते पणजी शिमगोत्सव समितीचे सदस्य होते. त्यांच्या पश्चात पत्नी, पूत्र, मुलगी, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# केरी समुद्रात फिश ब्रिडींग योजनेची कार्यवाही

## मच्छीमार मंत्री हळर्णकर यांच्या हस्ते शुभारंभ

टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. २७ : केंद्र सरकारच्या मच्छीमार योजनेतंर्गत गोव्यात १४ मत्स्य उत्पादन वाढीसाठी खास योजना राबवली असून, मांद्रेतील केरी व हरमल या दोन भागात ही योजना चालू करण्यात येईल. सदर योजना केरी भागातील मच्छीमार बांधवांना उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन मच्छीमार खात्याचे मंत्री नीळकंठ हळर्णकर यांनी व्यक्त केले.



केरी : मच्छीमार योजनेचा शुभारंभ करताना खात्याचे मंत्री नीळकंठ हळर्णकर. सोबत आमदार जीत आरोलकर,सरपंच धरती नागोजी, अनुपमा मयेकर, सूलक्षा तळकर व इतर.

केरी तेरेखोल पंचायतक्षेत्रातील फेरी धक्क्यावर आयोजित कार्यक्रमात मंत्री हळर्णकर बोलत होते. कृत्रिम पद्धतीने मत्स्य उत्पादन वाढीचा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला. यावेळी स्पीड बोटीतून खोल समुद्रात जात सिमेंट ब्लॉक्स पाण्यात टाकून योजनेचा शुभारंभ केला. नैसर्गिक पद्धतीने मत्स्य उत्पादन करताना नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढविण्यासाठी केंद्र सरकारची योजना आहे. या योजनेस ४ कोटी २ लाख खर्चून ही योजना पेडणे ते काणकोणपर्यंत राबवली जाईल. या योजनेचा फायदा मच्छीमार बांधवांना निश्चित होईल त्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मंत्री हळर्णकर यांनी केले.

मांद्रे मतदारसंघात मच्छीमार खात्यातर्फे हरमल व मांद्रे येथे मासळी मार्केट प्रकल्प,केरी येथे फिश रॅम्प, मोरजी येथे मार्केट व फिशिंग रॅम्प योजना मच्छीमार बांधवांसाठी मंजूर केल्याबद्दल,मंत्री हळर्णकर यांचे आमदार जीत आरोलकर यांनी आभार मानले. केंद्रीय योजनेचे सादरीकरण हरमल येथे मच्छीमार बांधवांसाठी घेतले होते, त्या प्रकल्पाचा शुभारंभ आज केरी समुद्रात होत असून आगामी काळात अनेक प्रकल्पांची पायाभरणी केली जाईल,ज्यात मच्छीमार बांधव हरमल, मोरजी व केरी भागात जास्त प्रमाणात आहेत. त्यांना या योजनेचा लाभ मिळेल व त्यांनी सहकार्य करावे, असे आमदार आरोलकर यांनी व्यक्त केले.

अंदाजे तीन किलोमीटर खोल समुद्रात बोटीने जाऊन खास सिमेंट ब्लॉक बोटीवरून आणले होते. त्या ब्लॉकचे जेसीबीच्या सहाय्याने पाण्यात टाकून कृत्रिम पद्धतीने मत्स्य उत्पादन वाढ होईल, असा अंदाज आहे. यावेळी सहसंचालक बेळीप यांनी माहिती दिली.

यावेळी मच्छीमार खात्याचे संचालक ई इल्लावन, सहसंचालक वेळीप, केरी सरपंच धरती नागोजी, हरमल सरपंच अनुपमा मयेकर, पंच संतान फर्नांडिस, केरी पंच अजय गाड, दर्शना नाईक, सूलक्षा तळकर, जुझे गुदिन्हो आदी उपस्थित होते.

**CHANGE OF NAME**

I, **SHEEBA PULIKKAL SANKARAN** Resident of H No 1130/9, Anganwadi Nagar, Penha De France, Porvorim, Bardez Goa has change my name from **SHEEBA PULIKKAN SANKARAN** to **SHEEBA PULIKKAL SANKARAN** Hereinafter in all my dealings and documents I will be known by new name of as **SHEEBA PULIKKAL SANKARAN.**

# बांदेश्वर दर्शनाला हजारो भाविकांची गर्दी

टीम दैनिक हेराल्ड

बांदा, दि.२७ : येथील प्रसिद्ध जागृत स्वयंभू श्री देव बांदेश्वर मंदिर कलशारोहण सोहळ्याच्या नवव्या वर्धापन दिनानिमित्त हजारो भाविकांनी श्री बांदेश्वराचे दर्शन घेतले. हर हर हर हर सांब सदाशिव च्या गजराने सर्व वातावरण शिवमय झाले.

या सोहळ्यानिमित्त मंदिरात सकाळपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.सकाळी श्री गणपती पूजन, देवतांस नारळ, विडे अर्पण करून सामुदायिक गाऱ्हाणे झाले.त्यानंतर सकाळी ८.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत श्री देव बांदेश्वर मंदिरात रुद्र अभिषेक अनुष्ठान, श्री देवी भूमिका मंदिरात श्री सूक्त आवृत्ती अनुष्ठान, श्री गणेश मंदिरात गणपती अथर्वशीर्ष आवृत्ती जप अनुष्ठान आदी विविध धार्मिक विधी ब्राह्मण वृंदाकरवी करण्यात आले. दुपारी महाआरती होऊन महाप्रसादास आरंभ झाला. सायंकाळी स्थानिक मंडळाची भजने त्यानंतर युवा कीर्तनकार ह. भ. प. विनीत महाराज म्हात्रे ,डोंबिवली यांचे कीर्तन तर रात्री श्रींचा पालखी सोहळा आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

भाविकांनी हजारोंच्या संख्येने या सोहळ्यास उपस्थित राहून दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला.

**दुःखद निधन**



**श्री. सुरेंद्र काकोडकर (८२ वर्षे)**

**चिंचोळे भाटले, पणजी गोवा**

यांचे काल २७ एप्रिल २०२५ रोजी दुःखद निधन झाले.

**त्यांच्या पश्चात पत्नी सुप्रिया, पुत्र/सून : संकेत/सिमरन, कन्या/जावई : संपदा/ रूपक चक्रवर्ती, नातवंडे : सिया, क्रिश व गार्गी,** असा परिवार आहे.

**अत्यंसंस्कार गुरुवार दि. १ मे २०२५ रोजी सकाळी १० सांतिनेज स्मशानभूमीत करण्यात येतील.**

## पान १ वरून

### नौदलाचा अरबी समुद्रात युद्धसराव

लक्ष्यावर मध्यम पल्ल्याच्या पृष्ठभागावरून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्र (एमआर–एसएएम) प्रणालीची यशस्वी चाचणी केली. प्रोजेक्ट १५बी गाईडेड मिसाइल डिस्ट्रॉयर प्रोग्रामचा भाग असलेल्या आयएनएस सुरतला अत्याधुनिक शस्त्र आणि सेन्सर प्रणालींनी सुसज्ज करण्यात आले आहे, आणि ती जागतिक स्तरावर अत्यंत प्रगत युद्धनौका मानली जाते.

----------------

### पाकिस्तानींचा गोव्याला 'गुडबाय'

मुख्यमंत्र्यांनी असेही नमूद केले की, राज्यातील सुरक्षा व्यवस्था तातडीने वाढवण्यात आली आहे आणि शनिवारपासून स्थलांतरित लोकांच्या वस्त्यांमध्ये शोध मोहीम सुरू करण्यात आली आहे. हे सर्व उपाय पहलगाम हल्ल्यानंतर राज्यातील सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेणाऱ्या उच्चस्तरीय बैठकीत घेतले गेले आहेत.

आपत्कालीन व्हिसावर भारतात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना त्यांच्या देशात परतायची अंतिम मुदत रविवारी संपली . गेल्या दोन दिवसांत अटारी–वाघा सीमा बिंदूवरून सुमारे २७२ पाकिस्तानी नागरिक भारतातून बाहेर पडले आहेत. रविवारी उशीरापर्यंत हा आकडा आणखी वाढेल . तसेच पंजाबमधील आंतरराष्ट्रीय सीमा क्रॉसिंगवरून पाकिस्तानातून १३ राजदूत आणि अधिकाऱ्यांसह तब्बल ६२९ भारतीय परतले आहेत. दरम्यान जम्मू–काश्मीर पोलिसांनी स्थानिक अतिरेकी आणि त्यांच्या समर्थकांविरुद्ध कारवाई वाढवली असून अनंतनाग जिल्ह्यात १७५ जणांना ताब्यात घेतले आहे. गेल्या तीन दिवसात स्थानिक संशयित दहशतवाद्यांची १० घरे जमीनदोस्त करण्यात आली आहेत.

-------------

### वाहनाच्या धडकेत दुर्मिळ ब्लॅक पँथरचा मृत्यू

वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की हा अपघात कदाचित प्राणी रस्ता ओलांडताना घडला असावा. स्थानिक एका नागरिकाने जखमी पँथरला रस्त्यावर पडलेले पाहिले आणि तत्काळ पोलिसांना माहिती दिली.

वनमंत्री विश्वजित राणे यांनी या घटनेची गंभीरतेने दखल घेतली असून चौकशीचे आदेश दिले आहेत. प्राण्यांच्या वाचविण्यात सक्रियपणे सहभागी असलेले प्राणीप्रेमी चरण देसाई यांनी सांगितले की, माहिती मिळाल्यानंतर आम्ही घटनास्थळी धाव घेतली होती, परंतु दुर्दैवाने या दुर्मिळ प्राण्याचा मृत्यू झाला. आम्हाला या प्राण्याच्या मृत्यूबद्दल अत्यंत दुःख झाले. या प्रकारच्या घटनांसाठी आपत्कालीन सेवांची आवश्यकता आहे. आम्ही त्यासाठी सरकारकडून अधिकृत परवानगी घेण्याची तयारी केली आहे. त्यांनी स्पष्टपणे नमूद केले की, नवीन महामार्ग आणि रस्ते बांधताना प्राण्यांच्या सुरक्षिततेसाठी आपत्कालीन सेवा आणि संरक्षित क्रॉसिंगची व्यवस्था असायला हवी.

प्रियोळ येथील स्थानिक नागरिकांनीही या घटनेबाबत शोक व्यक्त केला. त्यांचे म्हणणे आहे की, आज सकाळी ब्लॅक पँथर पाहून आनंद झाला होता, पण आता त्याच्या मृत्यूबद्दल दुःख होत आहे. जखमी प्राण्यांसाठी आपत्कालीन सेवा १०८ सारखी कार्यक्षम असायला हवी. तसेच, रस्ते आणि महामार्ग बांधताना प्राण्यांसाठी सुरक्षित अंडरपाससारख्या सुविधा निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे.

या घटनेने रस्ते आणि महामार्ग विकासाच्या प्रक्रियेत प्राण्यांच्या सुरक्षेबद्दल जागरूकता निर्माण करण्याची गरज अधोरेखित केली आहे. स्थानिक आणि वनविभागाच्या सहकार्याने भविष्यात अशा घटनांना टाळण्यासाठी उपाययोजना केल्या जाऊ शकतात.

-------------

### भारताने झेलम नदीत पाणी सोडले

रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी पळून जाण्याचे सुचवले. स्थानिक रहिवाशांनी याबाबत सांगितले की, पाण्याचे आगमन अचानक झाले आणि त्यात बचाव करण्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागला. आमच्याकडे कोणताही इशारा नव्हता. पाणी वेगाने येत होते आणि आम्हाला जीवित आणि मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी संघर्ष करावा लागला, असे पीओकेमधील हत्तीयन बाला येथील रहिवासी मुहम्मद आसिफ यांनी माध्यमांना सांगितले.

पाकव्याप्त काश्मीरच्या प्रशासनाने एक निवेदन जारी करून स्थानिकांना झेलम नदीजवळील ठिकाणे टाळण्याची शिफारस केली. भारताने झेलम नदीत नेहमीपेक्षा जास्त पाणी सोडल्यामुळे, मध्यम पूर आलेला आहे,असे प्रवक्त्याने सांगितले. कोहाला आणि धालकोट येथील सखल भागात पूर परिस्थिती उद्भवली आहे, ज्यामुळे प्राण्यांचे नुकसान व शेतीचे नुकसान झाल्याच्या बातम्या आहेत.

पीओके प्रशासनाने 'भारतावर ' जल दहशतवादाचा ' आरोप केला आहे, कारण भारताने पूर्वसूचना न देता पाणी सोडले आणि यामुळे सिंधू पाणी कराराचे उल्लंघन झाल्याचा दावा केला आहे. १९६० च्या सिंधू पाणी करारानुसार, दोन्ही देशांना नदीच्या प्रवाहातील बदलांसाठी पूर्वसूचना देणे आवश्यक आहे.

पीओकेमधील अधिकाऱ्यांनी सांगितले की, नागरिकांचे संरक्षण करणे प्राथमिक प्राधान्य आहे. हत्तीयन बाला प्रशासनाने तात्पुरते निवारे स्थापन केली आहेत आणि बचावकार्य सुरू केले आहे. आम्ही शक्य ते सर्व करत आहोत, परंतु या संकटाची व्याप्ती प्रचंड आहे, असे जिल्हा आयुक्त बिलाल अहमद यांनी सांगितले.

अधिकाऱ्यांनी स्थानिकांना नदीकाठच्या ठिकाणांपासून दूर राहण्याचे आणि मासेमारी किंवा जनावरे चरण्याचे टाळण्याचे आवाहन केले आहे. भारतीय अधिकाऱ्यांनी या घटनेवर मौन ठेवले असून, ते याची पुष्टी किंवा खंडन करत नाहीत. तथापि, काही भारतीय माध्यमांनी असा इशारा दिला आहे की जम्मू आणि काश्मीरमध्ये मुसळधार पावसामुळे विसर्ग सामान्य धरण ऑपरेशनचा भाग होता.